# महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापुर

महिला व बाल कल्याण विभागाकडिल योजनासाठी जिल्हा परिषद अंदाजपत्रकातील 10 टक्के रक्कम महिला व बाल कल्याण विभागासाठी राखुन ठेवण्यात येते.
ग्रामविकास विभागाकडिल शासन निर्णय दि 24/01/2014 व शासन शुध्दीपत्रक दि 19/01/2021 अन्वये 10 टक्के जि.प स्वनिधी मधील योजना महिला व बाल कल्याण समितीच्या मान्यतेने राबविण्यात येतात.

सन 2023-2024 ची 10 टक्के जि.प स्वनिधी तरतुद र.रु 2,83,30,000/-इतकी आहे.

महिला व बाल विकास विभागाकडील कर्मचारी

# **एकूण कार्यरत पदे - 04**

| †.Ûîú.<br>अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| 1 | कक्ष अधिकारी | 01 | 01 | 0 |
| 2 | वरिष्ठ सहा.लेखा | 01 | 01 | 0 |
| 3 | कनिष्ठ सहाय्यक | 01 | 01 | 0 |
| 4 | परिचर | 01 | 01 | 0 |

**महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर**

**सन 2023-24 मध्ये 10% जि. प स्वनिधीमधुन राबविण्यात येणाऱ्या योजना**

| अक्र | लेखाशिर्ष क्रमांक | योजनेचे नांव | योजनेस लावण्यात आलेली तरतुद | ÜÖ“ÖÔ ¸üŒÛú´Ö ¹ý¯ÖµÖê | 2024-25 Ûú¸üßŸÖÖ ÃÖ´ÖÙ¯ÖŸÖ Ö Ûêú»Öê»Ö ß ¸üŒÛú´Ö | ×¿Ö»»ÖÛú ¸üŒÛú´Ö ¹ý¯ÖµÖê | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **18 संकिर्ण मबाक** | **अ गटातील योजना 50% प्रमाणे (प्रशिक्षण)** | | | | | |
| 1 | 2236-0103 | ग्रामिण भागातील मुलींना व महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे. (फूड प्रासेसिंग) | 3500000 | 0 | 3500000 | 0 | सन 2024-25 मध्ये योजना राबविणेकरीता निधी समर्पित |
| 2 | 2236-0104 | समुपदेशन केंद्र / हेल्पलाईन केंद्राना अनुदान देणे | 762000 | 612000 | 0 | 150000 | वित्तप्रषण गट स्तरावर वितरीत |
| 3 | 2236-0105 | कार्यालयीन खर्च | 350000 | 350000 | 0 | 0 | कार्यालयीन खर्च, संगणक खरेदी कार्यवाहीत |
| 4 | | माता सक्षमीकरण किशोरवयीन मुलींना व महिलांना जेंडर बाबत तसेच आरोग्य व कुटूंब नियोजनाबाबत प्रशिक्षण | 1000 | 0 | 0 | 1000 | |
| 5 | 2236-0106 | बालवाडी व अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांना प्रशिक्षण देणे | 1100000 | 123320 | 976680 | 0 | शिल्लक तरतुद समर्पित |
| 6 | 2236-0108 | महिला व बाल कल्याण समिती सदस्यांचा अभ्यास दौरा | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | 2236-0107 | बालवाडी व अंगणवाडी सेविका, मदतनीस,पर्यवेक्षिका, यांना पुरस्कार देणे आदर्श अंगणवाडी सेविका पुरस्कार | 700000 | 502020 | 0 | 197980 | पुरस्कार वितरण कार्यक्रम न झालेमुळे खर्च कमी |
| 8 | 2236-0111 | 7 वी ते 12 वी उत्तीर्ण मुलींना MS- CIT प्रशिक्षण अनुदान देणे | 2685000 | 2683000 | 0 | 2000 | DBT व्दारे वर्ग |
| 9 | 2236-0113 | महिला व बाल कल्याण योजनांची प्रचार, प्रसार व प्रसिध्दी व दस्तवेज खरेदी करणे इत्यादी. | 500000 | 499998 | 0 | 2 | |
| 10 | 2236-0115 | "तारांगणा" कला, क्रिडा व शिक्षण क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुलींचा सत्कार | 400000 | 287890 | 0 | 112110 | पुरस्कार वितरण कार्यक्रम न झालेमुळे खर्च कमी |
| 11 | | **संकीर्ण** | 2000 | 0 | 0 | 2000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **ब गटातील योजना 50% प्रमाणे** | | | | | | | |
| 12 | 2236-0120 | अंगणवाडी / बालवाडींना साहित्य पुरविणे - (शैक्षणिक, लेखन साहित्य) | 7777000 | 4999968 | 2777000 | 32 | 5000000/- देयक सादर उर्वरित 2777000 समर्पित |
| 13 | 2236-0117 | कुपोषित मुलां- मलींसाठी तसेच गरोदर महिला व स्तनदा मातांसाठी अतिरिक्त आहार पुरविणे | 2500000 | 2499840 | 0 | 160 | अनुदान खर्च |
| 14 | 2236-0118 | ग्रामिण भागातील सर्वसाधारण घटकातील महिलांना पिठाची गिरण अनुदान पुरविणे DBT | 2501000 | 2494800 | 0 | 6200 | DBT व्दारे वर्ग |
| 15 | 2236-0128 | ग्रामिण भागातील सर्वसाधारण घटकातील महिलांना ओला / सुका मसाला मशिन अनुदान पुरविणे DBT | 2500000 | 2494800 | 0 | 5200 | DBT व्दारे वर्ग |
| 16 | 2236-0121 | इ. 5 वी ते 12 वी मध्ये शिकत असलेल्या सर्व साधारण घटकातील मुलींना सायकली पुरविणे DBT | 2915124 | 2912000 | 0 | 3124 | DBT व्दारे वर्ग |
| 17 | 2236-0129 | अनाथ/ एकल मुलींसाठी शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य | 501000 | 500000 | 0 | 1000 | DBT व्दारे वर्ग |
| | | **संकीर्ण** | 5000 | 0 | 0 | 5000 | |
| **एकुण ब** | | | **18699124** | **15901408** | **2777000** | **20716** | |
| **एकंदर एकुण अ + ब** | | | **28699124** | **20959636** | **7253680** | **485808** | **73.03%** |
| **समर्पित केलेली रक्कम रुपये** | | | **7253680** | **0** | **0** | **0** | |
| **शिल्लक तरतूद व खर्च** | | | **21445444** | **20959636** | **7253680** | **485808** | **97.73%** |
| **जिल्हा वार्षिक योजना (विघयो) मधील योजना** | | | | | | | |
| **अक्र** | | **योजनेचे नांव** | **योजनेस लावण्यात आलेली तरतुद** | **खर्च रक्कम रुपये** | | **शिल्लक रक्कम रुपये** | **शेरा** |
| 1 | 2225-E 516 | अनुसुचित जातीतील इ. 5 वी ते 12 वी मध्ये शिकत असलेल्या मुलींना सायकली पुरविणे DBT | 2500000 | 1992000 | | 508000 | DBT व्दारे वर्ग |

## महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर

## जि. प.स्वनिधी व शासन निधीमधून  राबविणेत येणा-या योजना सन 2023-24

### योजना क्रमांक 1

- **योजनेचे नांव :-   महिला समुपदेशन केंद्र चालविणे.**
- **तरतुद- 7,62,000/-**
- **समुपदेशन केंद्र संख्या- 08 ठिकाण-** मुख्यालय,राधानगरी,शाहुवाडी,गडहिंग्लज,पन्हाळा,कागल,हातकणंगले, शिरोळ.
- **मानधन-**समुपदेशक यांना रु 9000/- दरमहा,50 टक्के जि.प.स्वनिधी, 50 टक्के पं.स सेस-विधिसल्लागार मानधन दरमहा रु 12000/- (जिल्हा स्तर)
- **योजनेचा उद्देश-** ग्रामीण  भागातील महिलांना त्यांचे वैयक्तिक,सामाजिक व कौंटुंबिक अडचणी बाबत मार्गदर्शन सल्ला देऊन अडचणीचे निवारण करणे.
- समपुदेशन केंद्रात  ग्रामीण भागातील कोणीही महिला आपली तक्रार घेऊन जाऊ शकते व त्यावर उपाय शोधू शकते. त्यासाठी कोणतेही शुल्क देणेची आवश्यकता नाही.
- **(राज्य महिला आयोगाची " सुहिता" हेल्पलाईन 7477722424)**

## योजना क्रमांक-2

- **योजनेचे नांव :-** इ.5 वी ते 12 वीत शिकत असलेल्या मुलींना सायकली खरेदीचे अनुदान देणे. (सर्वसाधारण घटक)

- **तरतुद-** 29,15,124/-प्रति लाभार्थी देय अनुदान-4000/-

- **योजनेचा उद्देश -** ग्रामीण भागात एस.टी. ची सोय नसते किंवा शाळेच्या वेळेत एस.टी. नसते. त्यामुळे मुली शाळेत जाऊ शकत नाहीत. चालत जाण्यामुळे बराचसा वेळ वाया जाऊ शकतो.सायकलीमुळे वेळेची बचत होते व मुलींचे शाळेतील गळतीचे प्रमाण थांबते.

- **लाभार्थी निवडीचे निकष**
- लाभार्थी मुलगी ग्रामीण भागातील असावी.
- लाभार्थी मुलगी इयता 5 वी ते 12 वी मध्ये शिकत असली पाहिजे.
- लाभार्थीचे वास्तव्य ते शाळा यातील अंतर कमीत कमी 2 कि.मी. किंवा 1 कि. मी. पेक्षा जास्त असावे.
- अनुदान मर्यादा जिल्हा परिषदेकडील खरेदी समिती निश्चित करेल ती राहील.
- लाभार्थींना देय असलेले अनुदान तालुका स्तरावरुन डिबीटी व्दारे लाभार्थीच्या खातेवर वर्ग केले जाते.
- लाभार्थी उद्दिष्ट -728 साध्य-728

# योजना क्रमांक -3

- **योजनेचे नांव-** ग्रामीण भागातील इयता 7 वी ते 12 वी पर्यंत शिकणा-या मुलींना संगणक प्रशिक्षणकरीता अनुदान देणे.

- **तरतुद-26,85**,000/-

- **देय अनुदान-**MS-CIT-3000/-,GCC/TBC-4000/-,CCC/Tally-2500/-

- **योजनेचा** उद्देश **-** ग्रामीण भागातील मुली संगणकाचे ज्ञान घेऊन त्याचे कौशल्य विकसीत करु शकतात. नोकरी व व्यवसायासाठी संगणकाची मदत होते.

- **लाभार्थी योजनेस पात्र होण्याचे निकष-**
- लाभार्थी ग्रामीण भागातील रहिवासी असावी.
- लाभार्थी संगणक परीक्षा उत्तिर्ण झालेली असावी.
- लाभार्थी दारिद्रय रेषेच्या कुटूंबातील असावी. अथवा वार्षिक उत्पन्न रु. 120,000/- पर्यंत असावे.
- अनुदान मर्यादा जिल्हा परिषदेकडील खरेदी समिती निश्चित करेल ती राहील.
- लाभार्थींना देय असलेले अनुदान तालुका स्तरावरुन डिबीटी व्दारे लाभार्थीच्या खातेवर वर्ग केले जाते.
- सन 2023-24 मध्ये 643 लाभार्थींना लाभ मंजूर करणेत आला आहे.

**योजना क्रमांक 4**

- **योजनेचे नांव :-** ग्रामीण भागातील अनु-सूचित जातीतील इ.5 वी ते 12 वीत शिकत असलेल्या मुलींना सायकल खरेदीचे अनुदान देणे. (विशेष घटक योजना )

- **तरतुद-**25,00,000/-

- **योजनेचा उद्देश -** ग्रामीण भागात एस.टी. ची सोय नसते किंवा शाळेच्या वेळेत एस.टी. नसते. त्यामुळे मुली शाळेत जाऊ शकत नाहीत. चालत जाण्यामुळे बराचसा वेळ वाया जाऊ शकतो.सायकलीमुळे वेळेची बचत होते व मुलींचे शाळेतील गळतीचे प्रमाण थांबते.

- **लाभार्थी निवडीचे निकष-**
- लाभार्थी मुलगी ग्रामीण भागातील असावी.
- लाभार्थी मुलगी इयता 5 वी ते 12 वी मध्ये शिकत असली पाहिजे.
- **लाभार्थी अनु-जातीतील असलेचा सक्षम प्राधिकारी यांचा जातीचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला आवश्यक.**
- लाभार्थींचे वास्तव्य ते शाळा यातील अंतर कमीत कमी 2 कि.मी. किंवा 1 कि. मी. पेक्षा जास्त असावे.
- अनुदान मर्यादा जिल्हा परिषदेकडील खरेदी समिती निश्चित करेल ती राहील.
- **लाभार्थी उद्दिष्ट-500**

## योजना क्र- 5

- **योजनेचे नांव- "तारांगणा योजना"** राज्यस्तरावर कला,क्रिडा व शिक्षण या क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेल्या 18 वर्षाखालील मुलांचा व मुलींचा सत्कार करणे
- **तरतुद- 4,00,000/-**
- **योजनेचा उद्देश -** ग्रामीण भागातील मुलींना कौशल्य विकासासाठी चालना मिळावी व त्यांना योग्य सन्मान मिळावा. **योजनेचे निकष-**
- सदर योजनेअंतर्गत 18 वर्षाच्या आतील मुलां-मुलींचा सत्कार करणेत येईल.
- लाभार्थींचे प्रस्ताव बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे कार्यालयाकडून मागविणेत येतील.
- पात्र लाभार्थीची निवड जिल्हा क्रिडा अधिकारी (क्रिडा प्रकारासाठी) / शिक्षणाधिकारी (माध्य)शिक्षणाधिकारी (प्राथ) (कला व शिक्षण प्रकारासाठी ) महिला व बाल कल्याण समितीव्दारे करणेत येईल.
- क्रिडा प्रकारासाठी जिल्हा क्रिडा अधिकारी यांची शिफारस आवश्यक.
- क्रिडा प्रकारासाठी शासन मान्य क्रिडा प्रकारात राज्य अथवा त्यापेक्षा उच्च स्तरावर प्राविण्य मिळविलेले असावेत.
- वैयक्तिक क्रिडा प्रकारात राज्यस्तरावर अथवा त्यापेक्षा उच्च स्तरावर प्रथम, व्दित्तीय,तृतिय क्रमांकाचे प्राविण्य मिळविलेले असावे.
- सांघिक क्रिडा प्रकारात राज्यस्तरावर प्रथम,व्दित्तीय व तृतीय क्रमांक आलेल्या संघातील कामगिरीमुळे राष्ट्रीयस्तरावर निवड झालेले लाभार्थी असावेत. अथवा उच्च स्तरावरील संघात वैयक्तिक निवड झालेली असावी.
- कला व शिक्षण प्रकारात राज्य स्तरावर प्रथम,व्दित्तीय व तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या मुला- मुलींची निवड कणेत येईल.
- सदर योजनेसाठी खालील क्रिडा पकारांचा समावेश करणेत यावा.
- **अ)** ऑलपिंक गेम्स, कॉमन वेल्थ गेम्स या प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये समावेश असलेल्या खेळ प्रकाराना या
- योजनांचा लाभ देणेत येईल.
- **ब)** ज्या वर्षात लाभ द्यावयाचा आहे त्या वर्षाच्या लगतच्या पार पडलेल्या व पुढील आयोजित होणा-या ऑलपिंक गेम्स, एशिएन गेम्स मध्ये समावेश असलेल्या खेळ प्रकाराचा विचार करणेत येईल.
- **क)**शालेय क्रिडा स्पर्धा , खेलो इंडिया युथ गेम्स व एकविध खेळाच्या अधिकृत आंतरराष्ट्रीय ,राष्ट्रीय तसेच राज्यसंघटनाव्दारा आयोजित अजिंक्यपद क्रिडा स्पर्धामधील सहभागी तसेच प्राविण्य धारक खेळाडूना सदर योजनेचा लाभ देणेत येईल.
- **ड)या** खेळामध्ये लगोरी,विटी दांडू,मलखांब, दोरीचा मलखांब इत्यादि शिवछत्रपती पुरस्कार व जिल्हा क्रिडा पुरस्कारासाठी पात्र खेळांचा समावेश करणेत येईल
- पात्र खेळाडूंना खालीलप्रमाणे रोख रक्कमेची बक्षिसे, शिल्ड व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल.

  **अ) राज्यस्तरीय स्पर्धा -प्रथम क्र रु. 5000/- व्दित्तीय क्र रु. 4000/- तृत्तीय क्र- रु. 3000/-**

  **ब)- राष्ट्रीयस्तरीय स्पर्धा-प्रथम/व्दित्तीय/तृत्तीय/सहभाग रु. 7500/-**

  **क)आंतरराष्ट्रीय स्पर्धा- प्रथम/व्दित्तीय/तृत्तीय/सहभाग रु. 10000/-**
- लाभार्थी निवडीचे अंतिम अधिकारी महिला व बाल कल्याण समितीस राहतील.

## योजना क्र- 6

- **योजनेचे नांव** :- आदर्श अंगणवाडी सेविका/ मदतनीस/पर्यवेक्षिका/मिनी अंगणवाडी सेविका यांना पुरस्कार देणे.

- **तरतुद-**7,00,000/-

- **नियम अटी :-**
- प्रत्येक प्रकल्पातून गुणानुक्रमे प्रथम,व्दित्तीय,तृत्तीय सेविका व मदतनिस यांची निवड करणेत येईल.सदर पुरस्कारार्थींना प्रथम क्रमांक रु. 5000/- व्दित्तीय क्रमांक रु. 4000/- तृत्तीय क्रमांक रु. 3000/- एवढी बक्षिसाची रक्म्कम देऊन शिल्ड व प्रमाणपत्रासह गौरविण्यात येईल.
- प्रकल्पातील प्राप्त प्रस्तावामधून जिल्हयातून तीन मिनी अंगणवाडी सेविका यांची गुणानुक्रमे प्रथम ,व्दित्तीय ,तृत्तीय अशी निवड करणेत येईल.मिनी सेविका यांना अनुक्रमे रक्क्म रुपये
- 5000/- रु. 4000/- व रु. 3000/- बक्षिसांची रोख रक्क्म तसेच शिल्ड व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल.
- प्रकल्पातील प्राप्त प्रस्तावामधून जिल्हयातून तीन पर्यवेक्षिका यांची गुणानूक्रमे प्रथम,व्दित्तीय,तृत्तीय अशी निवड करणेत येईल व त्यांना शिल्ड व प्रमाणपत्र देऊन गौरविणेत येईल.

- **योजनेचे नांव :-** ग्रामिण भागातील सर्वसाधारण घटकातील महिलांना स्वयंरोजगारासाठी **पिठाची गिरण** अनुदान पुरविणे.

- **तरतुद-** 25,00,000/-प्रति लाभार्थी देय अनुदान-10,800/-

- **योजनेचा उद्देश -** ग्रामीण भागातील सर्वसाधारण घटकातील महिलांचे जीवनमान उंचावणे,घरच्या घरी व्यवसाय करता यावी यासाठी पिठाची गिरण करीता अनुदान देणेत येते.
- **लाभार्थी निवडीचे निकष**
- लाभार्थी ग्रामीण भागातील रहिवासी असावी.
- लाभार्थीने विहित नमुन्यातील प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील.
- लाभार्थी महिला दारिद्रय रेषेच्या कुटूंबातील असावी अथवा
- वार्षिक उत्पन्न रु.1,20,000/- चे आतील असावे.
- लाभार्थीने वस्तू खरेदीची पक्की पावती सादर करणे आवश्यक राहील.
- लाभार्थीने यापूर्वी लाभ घेतलेला नसावा.
- अनुदान मर्यादा जिल्हा परिषदेकडील खरेदी समिती निश्चित करेल ती राहील
- सन 2023-24 मध्ये 231 लाभार्थींना लाभ मंजूर करणेत आला आहे.



- **योजनेचे नांव :-** ग्रामिण भागातील सर्वसाधारण घटकातील महिलांना स्वयंरोजगारासाठी **ओला / सुका मसाला मशिन** अनुदान पुरविणे.
- **तरतुद-** 25,01,000/-प्रति लाभार्थी देय अनुदान-10,800/-
- **योजनेचा उद्देश -** ग्रामीण भागातील सर्वसाधारण घटकातील महिलांचे जीवनमान उंचावणे,घरच्या घरी व्यवसाय करता यावी यासाठी ओला मसाला मशिनकरीता अनुदान देणेत येते.
- **लाभार्थी निवडीचे निकष**
- लाभार्थी ग्रामीण भागातील रहिवासी असावी.
- लाभार्थीने विहित नमुन्यातील प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील.
- लाभार्थी महिला दारिद्रय रेषेच्या कुटूंबातील असावी अथवा वार्षिक उत्पन्न रु.1,20,000/- चे आतील असावे.
- लाभार्थीने वस्तू खरेदीची पक्की पावती सादर करणे आवश्यक राहील.
- लाभार्थीने यापूर्वी लाभ घेतलेला नसावा.
- अनुदान मर्यादा जिल्हा परिषदेकडील खरेदी समिती निश्चित करेल ती राहील
- सन 2023-24 मध्ये ओला मसाला मशिन 103 व सुका मसाला मशिन 83 लाभार्थींना लाभ मंजूर करणेत आला आहे.



# • लेक लाडकी योजना 2023 •

शासन निर्णय क्र.एबावि-2022/प्रक्र251/का.6 दि.30 ऑक्टोबर 2023

**1 एप्रिल 2023 रोजी व त्यानंतर जन्माला येणाऱ्या मुलींसाठी लेक लाडकी योजना**

## योजनेची उदिष्ट्ये

- मुलीच्या जन्मास प्रोत्साहन देऊन मुलींचा जन्मदर वाढविणे.
- मुलींच्या शिक्षणास चालना देणे.
- मुलींचा मृत्युदर कमी करणे व बाल विवाह रोखणे.
- शाळाबाह्य प्रमाण 0 (शून्य) वर आणण्यासाठी प्रोत्साहित करणे.
- कुपोषण कमी करणे.






## लाभाचे स्वरूप

1) मुलीचा जन्म झाल्यावर रु.5,000/-
2) मुलगी पहिलीत गेल्यावर रु.6,000/-
3) मुलगी सहावीत गेल्यावर रु.7,000/-
4) मुलगी अकरावीत गेल्यावर रु.8,000/-
5) मुलीला अठरा वर्ष पूर्ण झाल्यावर रु.75,000/-

**एकुण लाभ रु.1,01,000/-**

**सन 2023-24 मध्ये 657 लाभार्थींना लाभ मंजूर करणेत आला आहे.**

# महिला व बाल कल्याण विभागाकडिल आडिट परिच्छेद गोषवारा

| अ.क्रं | विभागाचे नांव | लेखा परिक्षण तपशिल | एकुण परिच्छेद | 80 टक्के उदिष्ट | सादर केलेले परिच्छेद | मान्य परिच्छेद | अनुपालन तयार परिच्छेद | प्रलंबित परिच्छेद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | महिला व बाल कल्याण विभाग | स्थनिक निधी लेखा | 95 | 76 | 49 | 31 | 07 | 38 |
| 2 | महिला व बाल कल्याण विभाग | पंचायत राज समिती | 35 | 28 | 12 | 0 | 04 | 12 |
| 3 | महिला व बाल कल्याण विभाग | महालेखापाल | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | एकात्मिक बाल विकास सेवा योजना | स्थनिक निधी लेखा | 44 | 35 | 24 | 18 | 05 | 12 |
| 5 | एकात्मिक बाल विकास सेवा योजना | पंचायत राज समिती | 07 | 06 | 04 | 00 | 00 | 02 |
| 6 | एकात्मिक बाल विकास सेवा योजना | महालेखापाल | 02 | 02 | 01 | 00 | 00 | 01 |

# धन्यवाद ..